अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रुपये पंधरा हजार व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमहा प्रत्येकी रक्कम रुपये दहा हजार गैरअर्जदाराकडुन अंतरिम पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०६.** प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार हजर होऊन त्याने नोटीस व प्रकरणाची प्रत घेण्यास नकार दिल्याने निशाणी क्र. ०१ वर प्रस्तुतचे प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

**०७.** अर्जदाराच्या कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारांची गैरअर्जदाराने सबळ कारणाशिवाय उपेक्षा केली असे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |
| ०२. | अर्जदार गैरअर्जदाराकडून मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | .... अंशतः होकारार्थी. |
| ०३. | आदेश काय ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसाः

### मुद्दा क्र.१ करिताः-

**०८.** अर्जदाराच्या वतीने सुविद्य विधीज्ञ श्री. यु.के.काष्टे यांनी अर्जातील कथनानुसार युक्तीवाद केला व अर्जदारांना, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मंजूर करण्याबाबत न्यायालयाला विनंती केली.

**०९.** प्रस्तुत प्रकरणातील अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये सविस्तर असे घटनाक्रम नमुद केलेले आहे. प्रस्तुत अर्ज व मुख्य अर्जातील कथन विचारात घेतले तर लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराकडे राहिली. यावरुन अर्जदार व गैरअर्जदार यांचे वैवाहीक संबंध असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सुध्दा तिच्यावर

आव्हानीत न झाल्याने अर्जदाराच्या कथनाला पुष्ठी मिळते.

**१३.** प्रस्तुतच्या अर्ज हा भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम १४४ खाली दाखल झालेला असुन, हे न्यायालय याठिकाणी अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील लग्नाच्या वैद्यतेबाबत कोणताही निर्णय देऊ शकत नाही. अभिलेखावरुन आलेल्या दस्तऐवजांचा विचार करता प्रथमदर्शनी अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न झाल्याचे दिसुन येते व गैरअर्जदाराने सदरचे लग्न अवैद्य ठरवल्याबाबत कुठल्याही न्यायालयाचा निर्णय अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे आजपर्यंत अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील लग्न संबंध हे अस्तीत्वात आहे. वरील सर्व विवेचनाचा विचार करुन याठिकाणी हे नमुद करायला पाहिजे की, अर्जदाराला सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदारावर आहे. तो त्याच्या पत्नीच्या जवाबदारीतुन हात काढुन घेऊ शकत नाही. तसेच गैरअर्जदाराने प्रस्तुतचे प्रकरणात गैरअर्जदार हा हजर होऊन त्याने सदरच्या अर्जाची प्रत व नोटीस घेण्यास नकार दिलेला असल्याने प्रस्तुतचे प्रकरण त्याच्याविरुध्द एकतर्फा असल्याने त्याने अर्जदाराच्या कथनाला आव्हान केलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये केलेल्या कथनाला दुजोरा मिळतो. अशा परिस्थितीत अर्जदाराला अंतरीम पोटगी देण्याचे दायीत्व हे गैरअर्जदारावर आहे.

**१४.** दोन्ही बाजुंकडील त्यांच्या राहणीमानाचा दर्जा व आजच्या महागाईचा विचार करता मी या निष्कर्षावर पोहचतो की, अर्जदार क्र. १ हिला प्रतिमाह रुपये ३,०००/- (अक्षरी तीन हजार रुपये फक्त) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमाह प्रत्येकी रुपये १,०००/- (अक्षरी एक हजार रुपये फक्त) असे एकुण प्रतिमाह रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी पाच हजार रुपये फक्त) अंतरीम पोटगी मंजुर केल्यास ती योग्य व न्याय्य होईल. तसेच गैरअर्जदारावर सुध्दा अन्यायकारक होणार नाही. सबब, मी मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**०१.** अर्जदाराचा अर्ज (नि.क्र.०५) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

